# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## नवीन महाविद्यालयाकरीता

## सुधारीत जाहीर प्रगटन

संदर्भः १)शैक्षणिक/संलग्न—०३/२०२३—२४/११३४ दिनांक : ३०/१०/२०२३ रोजीचे जाहीर प्रगटन

२) उच्च तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. बृहत २०२३/प्र.क्र.५/विशि—५ दि. ०३/११/२०२३.

---

वरील संदर्भीय १ नुसार स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड हे बृहत आराखडया अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ पासुन विद्यापीठ कार्यक्षेत्रात (नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर जिल्हा) नवीन महाविद्यालयासाठी संस्थेकडून प्रस्ताव मागविण्याबाबत जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात आलेले आहे. तसेच दिनांक २२/०९/२०२३ रोजीच्या बृहत आराखडयातील स्थळबिंदूतील दुरुस्त्या/बदल तसेच नव्याने प्राप्त स्थळबिंदूची यादी शासनाने संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये प्रसिध्द केली आहे. यासाठी सादर करावयाचे विहीत नमुन्यातील प्रस्ताव / आवेदनपत्र, विद्यापीठाचा बृहत आराखडा व वार्षिक योजना (Perspective / Yearly Plan २०२४—२०२५) परिशिष्टांसह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.srtmun.ac.in यावर News / Circulars - Academic उपलब्ध करून देण्यात येत आहे.

संस्था/महाविद्यालयांनी आवेदनपत्र/प्रस्ताव, सादर करतांना शासन निर्णयात नमुद परिशिष्ट 'अ' सह विहीत केल्या प्रमाणे, विहीत शुल्कासह परिशिष्ट 'ब' नुसार आवेदनपत्र/प्रस्तावा सोबत आवश्यक सर्व कागदपत्रे क्रमाने जोडुन विद्यापीठात **दि. १५/११/२०२३** रोजी किंवा त्यापूर्वी संलग्निकरण विभाग, प्रस्तुत विद्यापीठ येथे कार्यालयीन वेळेतच (रविवार आणि सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) विहीत प्रक्रिया शुल्कासह सादर करावेत.

महाराष्ट्र शासनाचे दि. १५/०९/२०१७ शासन निर्णय व निर्देश, विद्यापीठ अनुदान आयोग (विद्यापीठाकडून महाविद्यालयांना संलग्निकरण ) विनियम २००९ नुसार नमूद केलेल्या विनियमातील तरतूदी व बृहत आराखडयामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे संस्थेने नवीन महाविद्यालयासाठी मागणी करण्यापूर्वी सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात नॅक, विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या निकषांनुसार मूलभूत व भौतिक सुविधा, अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र, तसेच बृहत आराखडयामध्ये निश्चित केलेल्या स्थळ/बिंदुच्या ठिकाणी आवश्यक जमीन, प्रस्तावित महाविद्यालयासाठी इमारतीचा वास्तुशास्त्राकडून तयार करुन घेतलेला नकाशा, इत्यादी सर्व बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्यामुळे नवीन महाविद्यालयासाठी प्रस्ताव /आवेदनपत्र सादर करण्यापूर्वी संबंधीतानी या बाबत खातरजमा करून घ्यावी. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ नुसार नवीन महाविद्यालयासाठी प्रस्तावाच्या अर्जाचा नमुना विद्यापीठ संकेतस्थळावरून प्राप्त करून ०३ (तीन) प्रतिमध्ये आवश्यक प्रक्रिया शुल्कासह दाखल करावा. (शुल्क तक्ता सोबत जोडला आहे.) **संलग्निकरण शुल्क तक्त्यातील ७ नंबर कॉलममधील प्रक्रिया शुल्क (Processing Fees) + प्रस्ताव शुल्क रु.२०००/— प्रमाणे भरणा करावेत**. हे शुल्क डी.डी. द्वारे किंवा NEFT/RTGS द्वारे वित्त व लेखाधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड IDBI बॅक, शाखा नांदेड, IFSC CODE-IBKL0000500 खाते क्रमांक 500104000028422 मार्फत स्विकारले जातील. याची नोंद घ्यावी. प्रस्तावासोबत परिशिष्ट 'ब' नुसार मुद्येनिहाय क्रमवार कागदपत्र जोडावीत त्यास अनुक्रमांक द्यावा व पताका लावावेत तसेच प्रस्तावासोबतच्या सर्व छायांकित पानांवर साक्षांकन असणे आवश्यक आहे.

वरील प्राप्त प्रस्तावातील परिशिष्ट 'ब' नुसार छाननी समितीने पात्र केलेल्या प्रस्तावाकरिता पाहणी समिती पाठविण्यात येईल. व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**सुचना** : प्रस्तुत विद्यापीठाचे जाहीर प्रगटन शैक्षणिक/संलग्न—०३/२०२३—२४/९७१ दिनांक २५/०९/२०२३ नुसार ज्या संस्थेने नवीन महाविद्यालयाकरिता प्रस्ताव सादर केलेले आहेत. त्यावर कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे पुन्हा तेच प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

संदर्भ शैक्षणिक/संलग्न—०३/२०२३—२४/
दिनांक : ०६/११/२०२३
स्थळ : नांदेड

कुलसचिव